अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# पोलीस महासंचालकांनीच केली सरकारची कोंडी

सरकार नावाची यंत्रणा किती भिकार असू शकते याची शेकडो उदाहरणे फक्त भारतातच सापडू शकतात.सामान्य माणसाच्या मतावर निवडून येणारे सरकार किंवा सत्ताधारी नंतर याच सामान्य माणसाला वेठबिगार ठरवतात. अशाच शेकडो उदाहरणांपैकी एक ताजे उदाहरण म्हणजे मुंबईत पोलिसांच्या गृहनिर्माण संस्थांसाठी दिलेले सहाही भूखंड त्याच सरकारने खाजगी बिल्डरांच्या घशात घातले. पोलिसांच्या निवाऱ्याचा हक्क असलेले हे भूखंड बिल्डर, काही बडे सनदी अधिकारी आणि राजकारण्यांनी लाटल्याचे सनसनाटी प्रतिज्ञापत्र पोलीस महासंचालकांनीच सादर केले आहे. सरकारनावाच्या भिकारपणावरच शिक्कामोर्तब झाले आहे. आतापर्यंत हे भूखंड लाटले गेल्याच्या तक्रारी झाल्या होत्या, सरकारने त्यातले सत्य कधीच पुढे येऊ दिले नाही. कारण या भूखंडांचे श्रीखंड ओरपण्यात आमदार, बिल्डर्स, अधिकारी अशा सगळ्यांचाच समावेश होता. पोलिसांना वाऱ्यावर सोडून आपापल्या आलिशान सोसायट्या या भूखंडांवर उभ्या केल्या. अत्यंत कमी पैशात लाटल्या गेलेल्या जागांवर ती सगळी टोळधाड तुटून पडल्याचे दिसून येते. कायद्यातील नियमांची मोडतोड करून केली गेलेली ही लुटालूट सरंजामशाहीलासुध्दा लाजवणारी म्हणावी लागेल. पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळाचे संचालक अरुप पटनाईक यांनी मुंबई उच्च न्यायालयात सादर केलेले प्रतिज्ञापत्र म्हणजे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सरकारच्याच कानशिलात सणसणीत थप्पड लगावल्यासारखे ठरते. विशेष म्हणजे सदरक्षणाय आणि खलनिग्रहणाय असे बोधवाक्य असलेल्या पोलीस यंत्रणेच्या सर्वोच्च अधिकाऱ्याने सरकारच्या खलनायकी प्रवृत्तीचीच चिरफाड केली हे एक बरे झाले. यातल्या एकेका मुद्द्याचा परामर्ष घेतला तर सरकार राजकारणी आणि अधिकारी भ्रष्टाचार करताना कसे एकमेकांचे भागीदार होतात. प्रामुख्याने सुरक्षा व्यवस्थेत जीवाची जोखीम पत्करणाऱ्या सामान्य पोलीस किंवा सैनिकाला किती गौण ठरवतात त्यावरही यानिमित्ताने प्रकाश पडतो.कारण मुंबईच्या कुलाबा भागातला मोक्याचा भूखंड याच पध्दतीने कारगिल युध्दातल्या हुतात्मा सैनिकांच्या नावाने बळकावला गेल्याचे प्रकरण अजूनही गाजते आहे. त्यात त्या सैनिकांच्या एकाही कुटुंबीयाला किंवा वारसदाराला जागा मिळाली नाही.पण असेच मोठे अधिकारी आणि राजकारणी अशा सर्वांनी त्या भूखंडाची लुटालूट केली.

## भूखंडांची लुटालूट

आदर्श सोसायटीचे हे प्रकरण तसे अलीकडचेच म्हणावे लागेल. कारण मुंबई पोलिसांना दिलेल्या सहाही भूखंडांचे प्रकरण पाहिल्यानंतर आदर्श इमारत प्रकरणालाही मागे टाकणारे हे भूखंड प्रकरण ठरू शकेल. पंचवीस वर्षांपूर्वीच आदर्श इमारतीसारखीच ही सहा प्रकरणे घडली असा त्याचा अर्थ निघतो. मुंबईतल्या मोक्याच्या जागी म्हणजेच वरळी सीफेसला लागून असलेले दोन भूखंड तर अंधेरीतल्या अंबोली भागातला भूखंड सरकारने पुन्हा आपल्या ताब्यात घेऊन बड्यांच्या पदरामध्ये घालण्याचे पापकर्म केले.एवढ्या मोक्याच्या जागा पोलिसांना कशाला द्यायच्या. ते भूखंड ज्यांच्याकडून भरपूर पैसा कमावता येईल अशांना देण्याचा हा घाट घातला गेला. आज मुंबईतल्या अनेक पोलिसांना आपल्या उशिराच्या ड्युट्या संपवून थेट कल्याण विरारपर्यंत आपल्या घरी रात्री जावे लागते. मुंबईत असलेल्या पोलीस वसाहतीची दुर्दशा पाहिल्यावर सरकार त्यांना कोणतीच किंमत देत नाही किंवा त्यांच्या राहणीमानाविषयी कोणतीच सरकारला चिंता नाही हे सिध्द होते. अशी ही पोलिसांच्या ताटातली भाकरी ओरबाडून घेणारी भिकार वृत्ती जोपासण्याचे काम सरकार नावाच्या यंत्रणेकडून होत आले.यासंदर्भात न्यायालय काय कठोर भूमिका घेते यावर बरेच अवलंबून राहील. आंबोलीतला ४८ हजार ५६० चौरस मीटरचा भूखंड पोलिसांना न देता तो राजकारणी आणि बड्या अधिकाऱ्यांच्या आलिशान घरांसाठी अक्षरश: दान केला गेला त्याला दान हा शब्दच योग्य ठरतो. कारण हा भूखंड पोलिसांना देता येईल शिवाय सव्वाचार कोटींची नुकसानभरपाई दिली जाईल असे आश्वासन राज्य सरकारने दिले होते. त्यातला एक शब्दही पाळला गेला नाही आणि एक रुपयासुध्दा नुकसानभरपाई दिली गेली नाही.उलट हाच भूखंड राजकारणी आणि अधिकारी यांच्या पाटलीपुत्र सोसायटीला तसेच कोकिलाबेन अंबानी रुग्णालयाला दिला गेला. पोलिसांना घरे न देता याच भूखंडाच्या एका भागावर कामधेनू नावाचा पंचतारांकित मॉल उभा राहिला.आता केवळ दहा हजार चौरसमीटरची उरलेली जागा देऊन पोलिसांची बोळवण केली गेली आहे.

## विषयाचे गांभीर्य वाढले

वरळीतही हाच प्रकार घडला. पोलिसांच्या तोंडाला पाने पुसून अत्यंत मोक्याची जागा आमदार आणि अधिकाऱ्यांनी स्वत:साठी बळकावली. तिथे पूर्णा, सुखदा आणि शुभदा नावाच्या इमारती उभ्या राहिल्या. स्वत:च्या सुखाचे शुभदायक पूर्ण करून घेतलेल्या लाभार्थींनी पोलिसांना मात्र तिथून हद्दपार केले. मुंबईत जागा बळकावण्याचे काम फक्त बिल्डर्सच करतात असे नाही तर सरकारमध्ये बसलेले अनेक राजकारणी आणि प्रशासकीय बोके हे लोणी मटकावण्याचे काम करतात. सामान्य पोलिसांची घोर फसवणूक करूनच ही कारस्थाने यशस्वी झाली आहेत. आता इथे इमारती उभ्या राहून दहा पंधरा वर्षे उलटल्याने कोणावर कितपत कारवाई होईल हे काहीच सांगता येत नाही. सामान्य पोलीस शिपायांसाठी दिलेले सहाच्या सहा भूखंड पळवण्याचा हा प्रकार काही वर्षांपूर्वीचा जरी असला तरी आता त्याला एक वेगळेच अधिकृत स्वरूप प्राप्त झाले. राज्याचा पोलीस महासंचालक दर्जाचा अधिकारी राज्य सरकारच्या बेजबाबदारपणाची लक्तरे जेव्हा टांगतो तेव्हा त्याचे गांभीर्य अधिकच वाढते. किंबहुना पोलीस महासंचालकांच्या या प्रतिज्ञापत्रामुळे सरकारच्या गैरव्यवहारावर शिक्कामोर्तब होते.सरकारला खरे तर आता तोंड दाखवायला जागा नाही. सध्या सरकारने केलेल्या कामांचा निवडणूक पूर्व पाढा वाचला जात आहे. परंतु सुरक्षा व्यवस्थेमध्ये महत्त्वाची कामगिरी बजावणाऱ्या पोलिसांकडे सरकारने नेहमीच दुर्लक्ष केले हे लपून राहात नाही. आम्ही तर यापूर्वीच पोलीस वसाहतीतली दुर्दशा मांडून सत्य सांगण्याचा प्रयत्न केला होता.